नवराष्ट्र
Jalgaon | 05 August 2026 | Page 2

Quick Heal Foundation
Securing Futures

सायबर सुरक्षा जनजागृती अभियान

जे.ई. स्कूल ज्युनिअर कॉलेज, मुक्ताईनगर येथे विशेष मार्गदर्शन सत्र

▶ **मुक्ताईनगर (वा.)** डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने जे.ई. स्कूल ज्युनिअर कॉलेज, मुक्ताईनगर येथे इयत्ता ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती अभियान अंतर्गत विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक विकास चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सत्रात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील विद्यार्थिनी प्रांजल मराठे व भाग्यश्री बढे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व समजावून सांगितले. यावेळी ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, ओटीपी व पासवर्ड सुरक्षितता, सोशल मीडियाचा जबाबदारीने व सुरक्षित वापर, तसेच विविध सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचा बचाव कसा करावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी केले विविध शंकांचे निरसन

- विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्राला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी कणखरे यांनी मार्गदर्शकांचे आभार मानून विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमांचा वापर करताना सतर्कता बाळगावी, सुरक्षित ऑनलाइन व्यवहार करावेत आणि सायबर सुरक्षेचे नियम नेहमी पाळावेत, असे आवाहन केले.
- विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त, ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.